"नांदेड शहरातील अनुदानित व स्वयं सहाय्यित प्राथमिक व माध्यमिक शाळेंचा तुलनात्मक अभ्यास."

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र
विद्याशाखेअंतर्गत विद्यावाचस्पती (पीएच.डी.) शिक्षणाशास्त्र
पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

-::संशोधक::-

श्री गणेश पुंडलिकराव कदम

-::मार्गदर्शक::-

डॉ.पाटील वैजयंता एन.
प्राध्यापिका (संचालिका)
शिक्षणशास्त्र विद्याशाखा,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

-::संशोधन केंद्र::-
शिक्षणशास्त्र विद्याशाखा
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

शैक्षणिक वर्ष
२०१७

अनुक्रमणिका

अ.क्र.	तपशिल	पान.नं.
०१	प्रस्तावना	**०१**
०२	समस्या विधान	**०१**
०३	संशोधनाची गरज	**०१**
०४	संबंधित साहित्याचा आढावा	**०३**
०५	संशोधनाचे महत्त्व	**०३**
०६	समस्येचे स्पष्टीकरण	**०३**
०७	संशोधनाची उद्दिष्टये	**०४**
०८	संशोधनाची गृहितके	**०४**
०९	संशोधनाची व्याप्ती व मर्यादा	**०४**
१०	संशोधन परिकल्पना	**०५**
११	संशोधन कार्यपध्दती	**०५**
	संशोधन पद्धती	**०५**
	संशोधनाची जनसंख्या	**०५**
	संशोधनाचा नमुना	**०५**
	नमुना निवड पद्धती	**०५**
	माहिती संकलनाची साधने	**०५**
१२	माहिती विश्लेषणाची साधने	**०६**
१३	प्रकरण योजना	**०६**
१४	वेळापत्रक	**०७**
१५	खर्चाचे अंदाजपत्रक	**०७**
१६	संदर्भग्रंथ	**०८**
	समारोप	**०९**

१. प्रस्तावना :

मानवी जीवन हे गतीमान आहे. विकास हा शिक्षणातून होतो असे मानले जाते. मानवाच्या सर्वांगाला शिक्षण हे व्यापून टाकणारे आहे. त्यामूळे जीवनातील विविध अंगाचा अंतर्भाव शिक्षण या संकल्पनेत झालेला दिसतो. शिक्षण म्हणजे संस्कृती, मूल्यसंस्कार, ज्ञान कौशल्ये आत्मसात करणे, या सर्व गोष्टीचा वारसा भावी पिढीला देण्याचे साधन म्हणजे शिक्षण. औपचारिक शिक्षणाबरोबरच प्रौढ शिक्षण, दुरस्थ शिक्षण, अनौपचारिक शिक्षण, मुक्त विद्यापीठाद्वारे मिळणारे शिक्षण या सर्वांद्वारे शिक्षण घरोघरी पोहोचविण्याचे कार्य सुरू आहे. कारण ज्ञानाच्या प्रस्फोटाबरोबरच नव्या समस्या, नवनवीन आव्हाने, वेगाने बदलणारे तंत्रज्ञान, त्यामूळे बदलणारी सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिती, बदलती जागतिक समीकरणे, मुक्त अर्थव्यवस्था अशा सर्व समस्या सोडविण्याची शक्ती केवळ शिक्षणामध्येच आहे. शिक्षणाने प्रत्येकाचे जीवन व्यापले आहे.

प्राथमिक व माध्यमिक स्तरामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय डोळयासमोर ठेवून, शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याचे राज्य शासनाचे प्रयत्न आहेत. अनुदान हे स्वातंत्र्यानंतर देण्यात आले. परंतु स्वयं सहाय्यित शाळांना मान्यता ही जुन २०१३ पासून राज्य शासनाकडून दिली जाते. राज्यपाल के. शंकरनारायण यांनी या योजनेमध्ये मुख्य बदल करून या योजनेस मान्यता दिली (जुन २०१३).

२. समस्या विधान :-

"नांदेड शहरातील अनुदानित व स्वयं सहाय्यित प्राथमिक व माध्यमिक शाळेंचा तुलनात्मक अभ्यास."

३. संशोधन समस्येची गरज :

शासनाने शिक्षणाच्या विविध स्तरावर गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी व सर्वापर्यंत शिक्षण पोहचविण्यासाठी विविध योजनांची अंमलबजावणी केलेली आहे. राज्यस्तरापासून ते

गावपातळीपर्यंत विविध योजना संबंधीची माहिती पोहचविण्यासाठी भरपूर अडचणी येत असतात. त्यामूळे योजनेचा हेतू कितीही चांगला असला मात्र अंमलबजावणी जर व्यवस्थित झाली नाही तर शेवटच्या घटकापर्यंत योजनेचे महत्त्व प्रभाविरित्या पोहोचत नाही. संशोधकाला या योजनेची परिस्थिती व कार्यवाही जवळून पाहायला मिळाली. समाजाचा घटक म्हणून शिक्षणाचा योग्य दर्जा मिळावा म्हणून शासन काय प्रयत्न करते याची माहिती जाणून घेणे संशोधकाला गरजेचे वाटले.

४. संशोधन समस्येचे महत्त्व :

प्रत्येक क्षेत्रात विविध समस्या येत असतात. त्याचप्रमाणे शिक्षणातही विविध प्रकारच्या समस्या येतात. त्या समस्यावर संशोधन करून त्या शास्त्रशुध्दरित्या सोडविण्याच्या अंगाने विचार केला जातो.

सदर संशोधनामुळे राज्य शासनाच्या अनुदानित व स्वयं सहाय्यित प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या विकासाची तुलना अभ्यासण्यासाठी मिळणार आहे. नांदेड शहरामधील अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळेची माहिती मिळेल व त्याचबरोबर स्वयं सहाय्यित शाळेची देखील माहिती संशोधकाने सादर करेल.

सदर संशोधनामूळे पुढीलप्रमाणे फायदे होणार आहेत :

प्राथमिक व माध्यमिक शाळेतील अभ्यासक्रम व पाठयक्रमाचा लेखाजोखा, अनुदानित व स्वयं सहाय्यित शाळेतील अध्ययन-अध्यापन पध्दतीची माहिती, दैनंदिन उपस्थिती, गुणवत्ता व दर्जा इत्यादी विषयीचे फायदे सदर संशोधनामुळे अभ्यासले जातील.

५. संबंधित साहित्याचा आढावा :

संशोधन समस्येतील पारिभाषिक संज्ञाच्या कार्यात्मक व्याख्या :

१) नांदेड शहर :

महाराष्ट्रातील एक जिल्हा असून हे मराठवाडयातील एक प्रसिध्द ऐतिहासिक शहर आहे. सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रात जिल्हा अग्रेसर आहे. या जिल्हयात अनेक महाविद्यालये आहेत तसेच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आहे.

- प्राथमिक शाळा : मराठी माध्यमाच्या इयत्ता १ ली ते ८ वी चा गट.
- माध्यमिक शाळा : मराठी माध्यमाच्या इयत्ता ९ वी व १० वी चा गट.
- अनुदानित शाळा : राज्य शासनाकडून शाळेतील कर्मचारी व शालेय साहित्य, इमारत इत्यादीसाठी मिळणारा निधी व मान्यता असलेली शाळा.
- स्वयं सहाय्यित शाळा : राज्य शासनाची मान्यता मिळवून स्व-खर्चाने शालेय गुणवत्ता व दर्जा टिकवून शाळा चालविण्याची जबाबदारी घेवून चालवित असलेली शाळा.
- तुलनात्मक अभ्यास : दोन प्रकारच्या शाळांमधील साम्य व भेदांचा अभ्यास.

६. समस्येचे स्पष्टीकरण :

नांदेड शहरामध्ये अनुदानित शाळांची संख्या मोठया प्रमाणावर आहे. तरीसुध्दा स्वयं सहाय्यित शाळांची संख्या देखील दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. अनुदानित शाळेतील अध्ययन-अध्यापन पध्दती, साहित्य, गुणवत्ता, दर्जा, सुविधा इत्यादी बाबतीत स्वयं-सहाय्यित शाळेत मिळणाऱ्या सुविधांचा विकासाच्या दृष्टिकोणातून केलेली तुलना याचा अभ्यास सदर संशोधनात संशोधकाने अंतर्भूत केला आहे.

७. सेशोधनाची उद्दिष्टये :

१. अनुदानित व स्वयंसहाय्यित शाळेंची माहिती मिळविणे.

२. अनुदान व स्वयं सहाय्यितत शाळेची प्रशासकीय माहिती मिळविणे.

३. अनुदानित व स्वयं सहाय्यित शाळेतील सोयी-सुविधांचा अभ्यास करणे.

४. अनुदानित व स्वयं सहाय्यित शाळेतील अध्ययन-अध्यापन पध्दतीची तुलना करणे.

५. मुल्यमापन पध्दतीची तुलना व अभ्यास करणे.

६. शिक्षक व विद्यार्थी यांना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.

७. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेची तुलना करणे.

८. संशोधनाची गृहितके :

१. प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याच्या दृष्टीने स्वय सहाय्यित शाळा शासनाने सुरू केलेली आहे. (RTE Act. २००५.)

२. सदर योजना प्राथमिक व माध्यमिक स्तरावर राबविली जाते.

९. संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

१. भौगोलिक व्याप्ती :

सदरील संशोधन कार्य नांदेड शहरातील प्राथमिक व माध्यमिक शाळेपूरते संबंधित आहे.

२. जनसंख्या व्याप्ती :

नांदेड शहरातील अनुदानित व स्वयं सहाय्यित प्राथमिक व माध्यमिक (इयत्ता १ ते १० वी) मराठी माध्यमांच्या १००% शाळांचा समावेश आहे.

३. आशय व्याप्ती :

प्रस्तुत संशोधन हे अनुदानित व स्वयं सहाय्यित प्राथमिक व माध्यमिक शाळेतील तुलना करताना येणाऱ्या समस्येच्या आशयाशी संबंधित आहे.

१०. संशोधन परिकल्पना :

१. प्राथमिक व माध्यमिक शाळेमध्ये (अनुदानित व स्वयं सहाय्यित) अध्यापन पध्दतीच्या वापराची तुलना करतांना त्यामध्ये काही प्रमाणात अडचणी निदर्शनास येतात.

२. अनुदानित प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळा यांच्यातील विद्यार्थ्यांचा विकास, गुणवत्ता व दर्जा आणि स्वयं-सहाय्यित प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा विकास, गुणवत्ता व दर्जा यामध्ये फरक आढळत नाही.

११. संशोधन कार्यपध्दती :

१. प्रथम संबंधित साहित्याचा आढावा व समस्येची निश्चिती करण्यात येईल.

२. समस्या व उद्दिष्टयानुसार संशोधन व नमूना कार्यपध्दती निश्चित करण्यात येईल.

३. कोणती प्रेरणास्तर चाचणी सदर संशोधनास उपयुक्त ठरेल त्याचा शोध घेण्यात येईल. ती चाचणी प्राप्त करून तिचे भाषांतर व विश्वसनियता पडताळण्यात येईल.

४. माहिती संकलन साधनांचे प्रमाणकिकरण करून माहिती गोळा करण्यात येईल.

५. संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात येईल.

६. मार्गदर्शकाच्या मार्गदर्शनाखाली प्रकरण लिहून ते अंतिम केले जाईल.

११.२. संशोधन पध्दती :

११.३. संशोधन जनसंख्या :

शहरातील अनुदानित व स्वयं सहाय्यित प्राथमिक व माध्यमिक शाळा

११.४. संशोधनाचा नमुना : १००%

११.५. नमुना निवड पध्दती : सहेतुक नमुना निवड पध्दती

११.६. माहिती संकलनाची साधने : प्रश्नावली, मुलाखती, संपादणूक चाचणी, निरीक्षण सूची

१२. माहिती / सामग्री विश्लेषणाची साधने :

शिक्षण प्रक्रियेत संख्याशास्त्रीय साधनांची गरज मुल्यमापन करण्यासाठी होते. परीक्षेत विद्यार्थ्यांना गुण दिल्यानंतर त्यांचा अर्थ शोधावा लागतो. विद्यार्थ्यांच्या प्राविण्याची सरासरी काढावी लागते. एका चाचणीत गुण आणि दुसऱ्या चाचणीत गुणांचा संबंध शोधावा लागतो. प्रश्नांची काठिण्यापातळी व भेदभाव क्षमता जाणून घ्यावयाची असते. यासाठी संख्याशास्त्रीय साधनांची गरज असते. सदर संशोधनासाठी पुढील साधनांची सामग्री विश्लेषणासाठी वापर करण्यात येईल.

१. अनुमानात्मक संख्याशास्त्रीय तंत्रज्ञान

२. t-टेस्ट

१३. संशोधन प्रकरण योजना :

प्रस्तुत संशोधनासाठी पुढीलप्रमाणे संशोधन अहवाल प्रकरण योजना करण्यात येईल.

प्रकरण १ - प्रस्तावना.

प्रकरण २ - संशोधनाशी संबंधित साहित्याचा आढावा.

प्रकरण ३ - संशोधन पध्दती

प्रकरण ४ - माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन

प्रकरण ५ - सारांश, निष्कर्ष व शिफारशी

१४. वेळापत्रक :

प्रस्तुत संशोधनासाठी पुढीलप्रमाणे संशोधन कार्याचे वेळापत्रक ठरविले आहे:

अ.क्र.	तपशिल	कालावधी
०१	संशोधन विषय निश्चिती	ऑक्टोंबर २०१७
०२	पूर्व संशोधन साहित्याचा आढावा	जानेवारी २०१८
०३	संशोधन आराखडा	मे २०१८
०४	माहिती संकलन साधन निर्मिती व प्रमाणकीकरण करणे	नोव्हेंबर २०१८
०५	माहिती संकलन	मार्च २०१९
०६	माहितीचे विश्लेषण	ऑक्टोंबर २०१९
०७	अहवाल टंकलेखन	जुन २०२०

१५. खर्चाचे अंदाजपत्रक :

अ.क्र.	तपशिल	खर्च
०१	पीएच.डी. प्रवेशशुल्क	२०,०००/-
०२	संबंधित साहित्याचा आढावा	१०,०००/-
०३	संदर्भ ग्रंथ खरेदी	२०,०००/-
०४	झेरॉक्स	१०,०००/-
०५	टंकलेखन	१५,०००/-
०६	संगणक खरेदी	५०,०००/-
०७	प्रबंध ५ प्रती	२०,०००/-
०८	कार्यशाळा, चर्चासत्रे	२०,०००/-
०९	प्रवास खर्च	२०,०००/-
१०	माहिती संकलन	१५,०००/-
११	प्रबंध दाखल करणे शुल्क	१५,०००/-
	एकूण	**२,१५,०००/-**

१६. संदर्भग्रंथ सूची :

Internet, शोधगंगा, RTE Act. २००५, अनुदानाविषयक राज्य शासनाचे नवीन निर्णय, स्वयं सहाय्यित शाळा मान्यता निर्णय, नियम व अटी, संबंधित वर्तमान पत्र, मासिक इत्यादी.

समारोप :

प्रस्तुत संशोधन आराखडा यामध्ये समस्याविधानाशी असणाऱ्या संकल्पना स्पष्ट करून संशोधन समस्येची उद्दिष्टये, गृहितके, परिकल्पना, वेळापत्रक, अंदाजित खर्चाचे विवरण, कार्यात्मक व्याख्या मांडण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच संशोधक ज्या समस्येचा अभ्यास करावयाचा आहे त्याची व्याप्ती किती आहे व त्याला अनुसरून संशोधन समस्येची मर्यादा काय आहे याचा तपशील संबंधित संशोधन आराखडयामध्ये दिलेला आहे.

वरील संशोधन आराखडयामध्ये समस्या विधान, प्रकरण योजना, व्याख्या, संशोधन पध्दतीचा योग्य वापराविषयी माहिती मार्गदर्शकाच्या मार्गदशनाखाली करण्यात आलेली आहे व ती संबंधित संशोधन आराखडयात अंतर्भुत केली गेली आहे.

धन्यवाद ।

-::मार्गदर्शक::-

डॉ.पाटील वैजयंता एन.
प्राध्यापिका (संचालिका)
शिक्षणशास्त्र विद्याशाखा,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

::संशोधक::-

श्री गणेश पुंडलिकराव कदम